Jagdamba Education Society's
# Santosh N. Darade Polytechnic
At.Babhulgaon, Tal.Yeola, Dist.Nashik- 423 401

S.N.D. POLYTECHNIC, BABHULGAON CENTRAL LIBRARY YEOLA DIST. NASHIK

## * Central Library *

Please Consider the Environment Before Printing…

**Date: 31/03/2025**

# Activity Name: Day Special

## दिन विशेष

### News Paper Name: आपलं महानगर

**Page No. 04**

# दिनविशेष

## तत्त्वज्ञ, गणितज्ञ आणि लेखक रेने देकार्त



रेने देकार्त हा आधुनिक तत्त्वज्ञानाचा जनक म्हणून प्रसिद्ध आहे. तत्त्वज्ञानाप्रमाणेच गणितातही देकार्तने मौलिक भर घातली आहे. त्याचा जन्म ३१ मार्च १५९६ रोजी फ्रान्समध्ये तुरेन या विभागातील ला हेग या गावी झाला. देकार्तचे वडील झोआकीम हे रेनच्या पार्लमेंटचे सभासद होते व उमरावांच्या कनिष्ठ श्रेणीत त्यांचा समावेश होत होता. देकार्तच्या दोन्ही बाजूच्या (आई-वडिलांकडील) नातलगांत अनेक व्युत्पन्न पंडित व्यक्ती होत्या. या सुसंस्कृत व व्यासंगाला अनुकूल अशा वातावरणात देकार्त वाढला. वयाच्या आठव्या वर्षी ला फ्लेश येथे जेझुइटांनी नव्यानेच स्थापन केलेल्या शाळेत त्याला पाठविण्यात आले. ग्रीक व लॅटिन भाषा, तर्कशास्त्र, नीतिशास्त्र, गणित, भौतिकी, तत्त्वमीमांसा यांचा त्याने अभ्यास केला. १६१८ मध्ये नॅसॉच्या प्रिन्स मॉरिसच्या सैन्यात तत्कालीन प्रथेप्रमाणे स्वयंसेवक म्हणून तो दाखल झाला.

देकार्तचा पहिला ग्रंथ म्हणजे Regulae ad Directionem Ingilenii हा १६२८ च्या सुमारास रचण्यात आला; जो १७०१ मध्ये प्रसिद्ध झाला. प्रमाण ज्ञानाच्या पद्धतीविषयीचा हा ग्रंथ आहे. १६३७ मध्ये गणित आणि भौतिकी या विषयांवरील एक ग्रंथ त्याने प्रसिद्ध केला. १६४१ मध्ये त्याचा Meditationes de Prima Philosophia हा ग्रंथ प्रसिद्ध झाला. यात देकार्तच्या तत्त्वज्ञानावर इतर तत्त्ववेत्यांनी घेतलेले आक्षेप आणि त्यांना देकार्तने दिलेली उत्तरे यांचाही अंतर्भाव आहे. यानंतर Principia Philosophiae हा त्याचा ग्रंथ १६४४ मध्ये आणि Les Passions de l ame हा ग्रंथ १६४९ मध्ये प्रसिद्ध झाला. रेने देकार्त याचे ११ फेब्रुवारी १६५० रोजी निधन झाले.

Nashik Edition

Mar 31, 2025 Page No. 4

Powered by: erelego.com

LIBRARIAN
MR.U.D. MULANI
SND POLYTECHNIC
YEOLA-423401

PRINCIPAL
PROF.U.B JADHAV
SND POLYTECHNIC
YEOLA-423401